
# दर्जेदार, पौष्टिक डाळींचा ‘कृषी संजीवनी’ ब्रँड

## दुष्काळात शेतकऱ्यांचा कडधान्य शेतीवर भर



दगडू पवार यांनी आपल्या शेतात तूर, मूग, उडीद अशी पिके घेतली आहेत. यंदा स्वतःच्या शेतातील कडधान्यांचा वापर ते डाळनिर्मितीसाठी करणार आहेत.

**अलीकडील काळात सातत्याने उद्‌भवणारी दुष्काळी स्थिती पाहता पांढरेवाडी (जि. सोलापूर) येथील कृषी संजीवनी या शेतकरी गटाने कडधान्य पीक पद्धतीवर भर दिला आहे. तूर, हरभरा, मूग आदींपासून डाळनिर्मिती करून गटाच्या अर्थव्यवस्थेला मजबूत आधार देण्याचा प्रयत्न केला आहे. रसायनांचा कमी वापर, विना पॉलिशिंग डाळींचा कृषी संजीवनी हा ब्रँडही त्यांनी पुढे आणला आहे.**

सुदर्शन सुतार

सोलापूर जिल्ह्यात पंढरपूर तालुक्यातील पांढरेवाडी हा उजनी डाव्या कालव्याच्या कार्यक्षेत्रात येणारा ऊसपट्टा मानला जातो. गावच्या कार्यक्षेत्रात सुमारे १०८९ हेक्टर शेतीक्षेत्र, पैकी ७०० ते ८०० हेक्टरवर ऊस असतो. मात्र अलीकडील काही वर्षांपासून सततच्या दुष्काळी स्थितीमुळे ऊसक्षेत्र घटत जाऊन ते ३०० हेक्टरवर आले आहे. गावात कृषी संजीवनी हा शेतकरी गट कार्यरत आहेत. त्यात सुमारे २० सदस्य आहेत. आपली शेतीची अर्थव्यवस्था दुष्काळातही मजबूत करायची, तर उसाला पर्याय शोधणे गरजेचे आहे, असे गटातील सदस्यांना वाटू लागले. त्यातून त्यांना कडधान्य पिकांचा पर्याय रास्त वाटू लागला.

### गटाने घेतला कडधान्य पिकांचा वसा

गावातील शेतकऱ्यांना गटातर्फे पुढे नेण्यासाठी गटाचे पवार यांनी पुढाकार घेतला. एम.ए.पर्यंत शिक्षण घेऊनही वडिलोपार्जित शेती करण्यालाच त्यांनी पसंती दिली. त्यांची १० एकर शेती आहे. ती सगळी उसाची. त्यांनी कडधान्य पीक पद्धतीवर विचार करताना गटाद्वारे डाळमिल उद्योगाचा प्रस्ताव शेतकऱ्यांसमोर ठेवला. उसाच्या पट्ट्यात हा प्रयोग तसा नवीनच होता. त्यामुळे यात आपण कितपत यशस्वी होऊ, याबाबत सारे साशंक होते. मात्र सामूहिकेते बळ महत्त्वाचे ठरले.



कृषी संजीवनी नावाच्या ब्रँडिंगखाली पॅकिंग केलेली मूगडाळ, मटकीडाळ व तूरडाळ.

### उद्योगाची मिळाली दिशा

गेल्या वर्षी मोहोळ येथील कृषी विज्ञान केंद्रात डाळमिल उद्योगावर आधारित प्रशिक्षण कार्यक्रम झाला. त्याला पवार यांच्यासह गटातील सदस्यांनीही हजेरी लावली. या उद्योगाची रूपरेषा त्यातून समोर आली.

सविस्तर अभ्यास, चर्चा व विचारांती या उद्योगाकडे वळण्याचे निश्चित झाले.

### रसायनमुक्त, विना पॉलिशिंग डाळ

**गेल्या वर्षी भागातील शेतकऱ्यांकडून रासायनिक खते किंवा कीडनाशकांचा वापर अत्यंत कमी झालेल्या धान्याची थेट खरेदी केली. यंदाही अधिकाधिक रसायनमुक्त असलेल्या शेतीवर भर दिला आहे. मात्र तेवढ्यावरच न थांबता विना पॉलिशिंग डाळनिर्मितीलाही प्राधान्य दिले आहे. डाळीतील पौष्टिक घटक टिकून राहावेत, तिचा आरोग्याचा दर्जा टिकून राहावा, हा त्यामागील उद्देश आहे.**

### मार्गदर्शन व साह्य

**मोहोळ येथील कृषी विज्ञान केंद्राचे कार्यक्रम समन्वयक डॉ. दिनेश नांद्रे, विषय विशेषज्ञ दिनेश क्षीरसागर यांनी गटाला तांत्रिक मार्गदर्शन दिले आहे. कृषी विभागाच्या पंढरपूर येथील आत्मा विभागाचे अधिकारी विलास भोसले यांनीही उद्योगाच्या प्रकल्प अहवालासह प्रस्ताव तयार करण्यापासून प्रत्येक ठिकाणी मदत केली.**

### ‘कृषी संजीवनी’ ब्रँड

**गटाने डाळींचा कृषी संजीवनी ब्रँड तयार केला आहे. सोलापुरातील शेतकरी बाजार, पंढरपुरातील मार्ट, तसेच पंढरपूर, सोलापुरातील घाऊक विक्रेत्यांना डाळींची विक्री सुरू केली आहे. स्वच्छ, गुणवत्तापूर्ण आणि चवदार मालाला चांगली मागणी आहे. शिवाय त्यांच्या किमतीही आवाक्यात आहेत. अर्धा किलो, किलो यासह ग्राहकांच्या मागणीनुसार ‘आवश्यक ते पॅकिंग उपलब्ध करून दिले जाते. तूरडाळ १२० रुपये, हरभराडाळ १०५ रु, मूगडाळ ९५ रु, मटकीडाळ ९० रु, उडीदडाळ १७० ते १३० रुपये असे दर ठेवले आहेत. मार्केटमधील दरांपेक्षा हे दर कमी असल्याचे पवार यांनी सांगितले.**

“

दुष्काळात कडधान्यांची शेती हा सक्षम पर्याय आहे. सध्या तासाला १०० किलो अशी डाळनिर्मितीची आमच्या उद्योगाची क्षमता आहे. येत्या काळात ती वाढेल. डाळनिर्मितीत वाया काही जात नाही. उदाहरण घ्या. १०० किलो हरभऱ्यापासून ७० किलो डाळ मिळते. शिवाय शिल्लक ३० किलोत कणी, भुसा वगैरे घटक मिळतात. शेळीपालन अलीकडे वाढले आहे. त्यासाठी खाद्य म्हणून त्याचा वापर होतो. त्याचीही विक्री आम्ही करीत आहोत.

– दगडू पवार : ९९२१४३०२१३



### उद्योग सुरू झाला

विदर्भ कोकण ग्रामीण बँकेच्या माध्यमातून खादी ग्रामोद्योग उद्योग महामंडळातंर्गत अर्थसाह्य घेत मागील वर्षी जुलैमध्ये मिनी डाळमिल हा लघुउद्योग सुरू केला. त्यासाठी स्वतंत्रपणे अडीच लाख रुपये खर्चून पत्रा शेड उभे केले. दोन लाख रुपयांची मशिनरी खरेदी केली. त्यापैकी २५ टक्के रक्कम ही ‘मार्जिन मनी’ म्हणून खादी ग्रामोद्योग महामंडळाने दिली. सुरवातीला डाळनिर्मितीसाठी कच्चा माल उपलब्ध नव्हता. तो बाजारातून खरेदी केला. त्यात अडीच लाख रुपये गुंतविले. साधारणपणे सर्व खर्च सात लाख रुपयांपर्यंत पोचला.

### खरेदीची व्यवस्था

मोडनिंब, वैराग आदी नजीकच्या बाजारपेठांतून तसेच शेतकऱ्यांकडून कच्चा मालाची खरेदी केली जाते. यंदाच्या वर्षी गटातील शेतकऱ्यांचेही उत्पादन आहे. विशेष म्हणजे या डाळमिल उद्योगामुळे परिसरात जवळपास ५० हेक्टरवर यंदा नव्याने तूर, मूग, मटकी, उडीद यांचे क्षेत्र वाढले आहे. शेतकऱ्यांकडून बाजारभावाप्रमाणे कडधान्याची खरेदी करण्यावर अधिक भर देण्यात येणार आहे. त्यातून शेतकऱ्यांना चार पैसे जादा मिळतील. विक्रीसाठी वाहतूक खर्च, आडत या गोष्टीही वाचतील.

### समाधानकार नफ्याची नोंद

उद्योग सुरू करण्याच्या पहिल्याच सहामाहित जवळपास ५० क्विंटल डाळ तयार झाली. त्यात हरभरा, मूग, मटकी, उडीद आणि तूर अशा प्रत्येकी १० क्विंटलचा समावेश राहिला. त्यातून खर्च वजा जाता सुमारे ६८ हजार ५०० रुपये नफा मिळाला. त्यानंतर मार्चपासून यंदाच्या २५ ऑगस्टपर्यंत जवळपास ४२ क्विंटल डाळ तयार झाली. त्यातून सुमारे ९८ हजार ७०० रुपये मिळाले. वर्षभरात एकूण १ लाख ६७ हजार ३०० रुपये नफ्यापर्यंत मजल मारणे शक्य झाले. त्यातून एकूण गुंतवणुकीच्या तुलनेत २५ टक्के रक्कम वसूल झाली.

### उसापेक्षा कडधान्यांना पसंती

पवार यांची दहा एकर शेती आहे. आतापर्यंत त्यांचे मुख्य पीक ऊसच होते. मात्र डाळमिल उद्योग सुरू केल्यानंतर कडधान्ये विकत आणण्यापेक्षा आपल्याकडील त्याचे उत्पादन वाढवण्याचे त्यांनी ठरवले. त्यातून सहा एकर तूर, प्रत्येकी दोन एकर मूग व उडीद असे पीकनियोजन त्यांनी यंदा केले आहे. तूर आता फुलोऱ्यात तर मूग, मटकी, उडीदही काढणीला येत आहेत.



कृषी संजीवनी गटाच्या डाळमिल उद्योगाची पाहणी करताना कृषी विज्ञान केंद्रातील तज्ज्ञ.